प्रेसनोट

जा.क्र. २१०/ माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक:—२३/०३/२०१७.

## भगतसिंग, राजगुरु, सुखदेव यांचे शहिद दिवस कार्यक्रम

भंडारा :— पोलीस नियंत्रण कक्ष भंडारा येथील प्रांगणात आज दि. २३/०३/२०१७ रोजी मा. पोलीस अधीक्षक भंडारा श्रीमती विनीता शाहु यांच्या अध्यक्षतेखाली_भगतसिंग, राजगुरु, सुखदेव यांचे शहिद दिवस कार्यक्रम साजरा करण्यात आला. २३ मार्च, १९३१ रोजी भगतसिंग लाहोरच्या तुरूंगात हसत हसत फासावर गेले. फाशी जाताना त्याचे वय अवघे २३ वर्षाचे होते. भारताला स्वातंत्र्य मिळावे म्हणुन अनेकांनी हौतात्म्य पत्करले. अनेक वीर शहीद झाले. त्या सर्वानाच इतिहासात एक मानाचे स्थान आहे. पण त्या सशस्त्र क्रांतीकारकातही भगतसिंग यांचे स्थान अदवितीय आहे. म्हणुनच त्यांना **'शहीद—ए—आलम'** असा किताब दिला जातो त्यांच्या स्मरणार्थ २३ मार्च हा दिवस, भारतात शहीद दिन म्हणुन पाळला जातो.

यावेळी कार्यक्रमाला मा. अप्पर पोलीस अधीक्षक रश्मि नांदेडकर, पोलीस उपअधीक्षक (गृह) एस.व्ही. कुलकर्णी सा. पोलीस नियंत्रण कक्ष अधिकारी भंडारा पोउपनि.ए.व्ही. तुळजेवार, पोलीस मुख्यालय भंडारा येथिल पोनि. लोळे तसेच शाखेचे अधिकारी व कर्मचारी पोलीस नियंत्रन कक्ष भंडारा येथे उपस्थित होते.

**पोउपनि.ए.व्ही. तुळजेवार**
**नियंत्रण कक्ष अधिकारी भंडारा**
**दुरध्वनी.क्र. ७७६८८६९९७७**

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.